प्रधान मुख्य वनसंरक्षक, (हेड ऑफ फॉरेस्ट फोर्स) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.
वनभवन, सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४० ००१, दूरध्वनी क्र.२५५६९१६

क्रमांक : कक्ष-१७/नोसेल/१/ 180 /१५-१६
नागपूर - ४४० ००१, दिनांक:- 08/05/2015

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रा),
चंद्रपूर

विषय:- वनजमिन- चंद्रपूर

बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राकरीता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत. मौजे चिचपल्ली ता. जि. चंद्रपूर स.क्र.६/१, आराजी १४.५२ हे. आर पैकी ५.०० हे. आर.

संदर्भ:- १. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-१७/नोसेल/१/७४, दि. १८/४/२०१५.

२. आपले पत्र क्र. कक्ष-५/सर्व्हे/जमिन/१४८, दि.२८/४/२०१५.

विषयांकित प्रस्ताव मुख्य वनसंरक्षक (प्रा), चंद्रपूर यांचे कडील पत्र क्र. कक्ष-३ (१)/जमिन/प्र.क्र.२६५/५२, दि. ९/४/२०१५ अन्वये प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात आला. त्या नूसार या कार्यालायचे पत्र संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये काही त्रुटी आढळून आल्या ते आपणास निदर्शनास आणून दिले व त्याची पूर्तता करणेकरीता संदर्भिय पत्र क्रमांक अन्वये कळविण्यात आले परंतू त्याची परी पूर्ण पूर्तता न करता प्रस्ताव तसाच पाठविणेत आला तरी खालील मुद्यांनूसार त्रुटींची पूर्तता करण्यात यावी व तसा अहवाल या कार्यालयास त्वरीत पाठविणेत यावा. शासनाकडून या कार्यालयासा सारखे तगादे येत असल्याने यास प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

| अ.क्र. | मुद्दा/त्रुटी | |
|---|---|---|
| १ | मुद्दा क्र. १<br>त्रुटी क्र. ३ | या कार्यालयाचे पत्र दि. १८/४/२०१५ अन्वये त्रुटीची पूर्तता करण्यास्तव कळविण्यानूसार त्रुटी क्र. ३ पुर्तता केलेली नाही.<br>विभागीय वन अधिकारी चंद्रपूर वनविभाग चंद्रपूर यांचे वृक्षतोडीबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे परंतू विभागीय वन अधिकारी चंद्रपूर यांनी प्रमाणपत्रावर स्वाक्षरी केलेली नाही. |
| २ | मुद्दा क्र. २<br>त्रुटी क्र. ४ | प्रस्तावात पूरातत्व विभागाकडून सदरची प्रस्तावित वनजमिन ही ऐतिहासीक धार्मिक प्राचीन स्थळे मंदीरे इत्यांदीचा समावेश होत नसल्याबाबतचे ना-हरकत प्रमणपत्र जोडण्यात यावे. |
| ३ | मुद्दा क्र. ३<br>त्रुटी क्र.५ | प्रस्तावात वनक्षेत्र/वनेत्तर क्षेत्राचा बाबवार Item wise break up of the forest land. प्रत्येक कामाचा गाव निहाय, गट/सर्व्हे क्रमांक निहाय क्षेत्र विवरण तक्त्यात माहीती देण्यात यावी. |
| ५ | त्रुटी क्र.३० | विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर यांनी संरक्षित क्षेत्राचा १० कि.मी चे आत असल्यासंबंधीचे प्रमाणपत्रात ०.०० कि.मी Eco-Sensitive zone सरहद्द असल्याचे चुकीचे दर्शविलेले आहे. वास्तविक पाहाता प्रस्तावित क्षेत्र सदर Eco-Sensitive Zone सरहद्दीपासून १.२५ कि.मी असल्याचे दिसून येते त्यानूसार प्रमाणपत्र दूरुस्त करण्यात यावे. |
| ५ | | प्रस्तावात Forest Rights Act -२००६ अंतर्गत जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र देण्यात यावे. |
| ६ | | प्रकल्प यंत्रणेने नक्त वर्तमान (Net Present Value) मुल्याची रक्कम भरण्यास तयार असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडावे. |

सहपत्र- वरीलप्रमाणे

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी
महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रतिलिपी:- उपवनसंरक्षक, चंद्रपूर वनविभाग चंद्रपूर यांना माहीती व उचित कार्यवाहीस अग्रेषित.
प्रतिलिपी:- प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर वनविभाग चंद्रपूर यांना माहीतीस अग्रेषित.